सन २०१५-१६ करिता राज्य योजनेतंर्गत "वनतळे/सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम (४४०६ ०७९७)" या योजनेतील विविध वनवृत्तांचा नविन बाब प्रस्ताव.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१५/प्र.क्र.१८६/फ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २५ जानेवारी, २०१६

वाचा :- १) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१७.०४.२०१५.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२९(१५-१६)/४२७/२०१५-१६, दि.१५.०६.२०१५.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२९(१५-१६)/४७५/२०१५-१६, दि.१८.०६.२०१५.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२९(१५-१६)/४९५/२०१५-१६, दि.२०.०६.२०१५.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.२९(१५-१६)/१७१६/२०१५-१६, दि.१७.१२.२०१५.
६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.एफडीएम-२०१५/प्र.क्र.१४०/फ-२, दि.२२.०६.१५.
७) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.एफडीएम-२०१५/प्र.क्र.१८६/फ-२, दि.०७.०७.१५.
८) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थसंकल्प-३, दि.०१.०१.२०१६
९) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१२.०१.२०१६

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ करिता "वनतळे/सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम (४४०६ ०७९७)" या योजनेकरिता एकूण रु.१३०३.२५ लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून रु.९१२.२८ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला होता. सदर अर्थसंकल्पित निधीच्या अनुषंगाने एकूण रु.६३७.७७ लक्ष इतका निधी संदर्भ क्र.५ व ६ येथील शासन निर्णयांन्वये वितरित करण्यात आलेला आहे.

२. आता, सदर योजनेअंतर्गत उर्वरित असलेला विना अर्थसंकल्पित रु.३९०.९७ लक्ष इतका निधी सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेला असून वित्त विभागाच्या संदर्भ क्र.८ व ९ येथिल परिपत्रकातील सुचनांच्या अनुषंगाने निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

३. वित्त विभागाच्या दि.०१.०१.२०१६ रोजीच्या व दि. १२.०१.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सन २०१५-१६ करिता "वनतळे/सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम (४४०६ ०७९७)" या लेखाशीर्षाअंतर्गत **रु.३८९.६२ लक्ष (०२ मजूरी रु.२७८.५९ लक्ष व २१-पुरवठा व सामग्री रु.१११.०३ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.या बाबत आवश्यकतेनूसार सदर लेखाशिर्षामधिल उद्दिष्टांतर्गत पुनर्वितरण करण्यात यावे. त्याअनुषंगाने वितरीत करण्यात येणाऱ्या निधीचा वनवृत्त व वनविभागनिहाय तपशिल खालील प्रमाणे:-

रक्कम रु.लाखात

अ.क्र.	**वनवृत्त**	**वनविभाग**	**मजुरी**	**पुरवठा व सामग्री**	**एकूण**
१	नाशिक	पुर्व नाशिक	६.५८	१.६५	८.२३
		मालेगाव	११.५१	२.८८	१४.३९
		संगमनेर	३.९८	१	४.९८
२	पुणे	पुणे	६.९१	२.९५	९.८६
		जुन्नर	१५.६३	६.७०	२२.३३
		सोलापूर	११.४३	४.९०	१६.३३
		भोर	१७.५०	७.५०	२५.००
३	ठाणे	रोहा	१४.७३	००	१४.७३
४	औरंगाबाद	परभणी	३४.००	२४.००	६०.००
५	चंद्रपूर	चंद्रपूर	४.००	६.००	१०.००
		ब्रम्हपूरी	१६.४५	२४.६८	४१.१३
		म.चांदा	१०.००	१५.००	२५.००
६	नागपूर	गोंदिया	१२३.८७	१३.७७	१३७.६४
	एकूण		**२७८.५९**	**१११.०३**	**३८९.६२**

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी

असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. मागील वर्षी सदर योजनेकरिता वितरित केलेल्या निधीच्या विनयोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१ वरील दि.१७.०४.२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तीची पूर्तता करण्यात येईल याची देखिल दक्षता घ्यावी.

५. सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र. सी-१०, प्रधान शिर्ष -४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनेतंर्गत योजना, १०१ वनसंरक्षण, विकास व पुनर्निर्मिती, (००)(०३) वनतळ्यांचे बांधकाम (राज्य) (४४०६ ०७९७) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाचा संदर्भ क्र.१ वरील दि.१७.०४.२०१५ रोजीचा शासन निर्णय तसेच वित्त विभागाचे संदर्भ क्र.८ व ९ वरील दि.०१.०१.२०१६ आणि दि. १२.०१.२०१६ रोजीची परिपत्रके आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र/१००८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दिनांक १५.०५.२००९ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२५१४३४१४१४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Dattatraye Laxman Thorat

Digitally signed by Dattatraye Laxman Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Dattatraye Laxman Thorat
Date: 2016.01.25 14:36:00 +05'30'

(डी.एल.थोरात)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

३) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), औरंगाबाद/चंद्रपूर/नाशिक/नागपूर/पुणे/ठाणे.

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.

८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.

९) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

१०) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.